# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २५/३/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२०) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **२५ मार्च २००८** रोजी मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ४.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म.), नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. पुरूषोत्तम ठाकुर
2. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
3. श्री. अ. रशीद खान (मामु)
4. श्री. संजय जोशी
5. श्री. वसंत नरवडे पाटील
6. श्री. मोहन मेघावाले
7. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
8. श्री.हाजी शेरखान अ. रहेमान
9. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**संवाद :**

मा.सभापती : विषय क्र. 464 ते 471 ला मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. 464 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, उस्मानपुरा भागात विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,60,579/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामाचे निविदापत्रके मागविली असता एकुण 4 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यातआली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | अरोरा कन्स्ट्रक्शन | 32.12% जास्त दराने |
| 2. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 35.20% जास्त दराने |
| 3. | एम. ए. सिद्यीकी | 38.86% जास्त दराने |
| 4. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 40.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे दर अं.प.दरापेक्षा 32.12% ने जास्त आहेत. परंतु मा.आयुक्त यांनी 19.00% जास्त दराने निविदेची शिफारस केली आहे. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.11,43,089/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 19.00% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा भागात विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक अरोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.00% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 465 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जालाननगर भागातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण, पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,35,726/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामाचे निविदापत्रके मागविली असता एकुण 2 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यातआली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | चंद्रम्मा एन. आशन्ना | 19.00% जास्त दराने |
| 2. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 30.99% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी चंद्रम्मा एन. आशन्ना यांचे दर अं.प.दरापेक्षा 19.00% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.20,65,513.94 एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी चंद्रम्मा एन. आशन्ना यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 19.00% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालाननगर भागातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण, पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक चंद्रम्मा एन. आशन्ना यांचेकडून सदरील काम अं.प. दरापेक्षा 19.00% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 466 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, देव इंद्रायणी अथर्व कॉम्प्लेक्स व्हाया सेनानगर पर्यंतच्या 15 मी. रूंद रस्त्याचे मजबुतीकरण करणे व कल्व्हर्ट बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.32,85,064/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामाचे निविदापत्रके मागविली असता एकुण 2 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यातआली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 19.19% जास्त दराने |
| 2. | चंद्रम्मा एन. आशन्ना | 25.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर अं.प.दरापेक्षा 19.19% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.39,15,467.78 एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 19.19% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देव इंद्रायणी अथर्व कॉम्प्लेक्स व्हाया सेनानगर पर्यंतच्या 15 मी. रूंद रस्त्याचे मजबुतीकरण करणे व कल्व्हर्ट बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प. दरापेक्षा 19.19% जास्त दराची ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 467 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र. 51 इंदिरानगर गल्ली नं.22 व 23 मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी वॉर्ड-क मार्फत एकत्रित अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.15,66,370/- चे तयार करण्यात आले होते. त्यासाठी सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या कामाचे यादीतील अ.क्र.29,30, 31,33 नुसार प्राप्त तरतुद रू.17 लाख मधुन खर्च करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास दि.6/10/2007 रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामाचे ई-टेंडर द्वारे निविदा मागविण्यात आले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 7.80% कमी दराने |
| 2. | एकनाथ माणिकराव दहिफळे | 5.10% कमी दराने |
| 3. | बी. बी. खंडागळे | 2.70% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.80% कमी दराची ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून निविदेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. करीता ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत सदर काम हाती घेण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 51 इंदिरानगर गल्ली नं.22 व 23 मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 7.80% कमी

दराची ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा.सभापती : ऐनवेळच्या विषयांना मान्यता देण्यात येते.

**: ऐनवेळचे विषय :**

(दि.24/3/2008 रोजी (का.प.क्र.21 दि.29.3.08) ले.प.अहवालावरील बैठकीची विषय पत्रिका वितरीत करण्यात आली त्यास **क्र.468** देण्यात आलेला आहे.)

**विषय क्र. 469 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बनेवडी येथील आरक्षण क्र. 2 व 3 मध्ये कब्रस्थान व स्मशानभुमी करीता संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सा.बां. विभागाच्या सन 2005-2006 च्या दरासूची नुसार रक्कम रूपये 22,56,998/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा विषय क्र.432 दि.25.9.2006 रोजी (दि.20.9.2006 ची तहकूब) संपन्न झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. सदरील काम स्मशानभुमी विकास सन 2006-2007 मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. अमन असोसिएट्स | 08.00% जास्त दराने |
| 2. | श्री. सय्यद शारीक | 09.00% जास्त दराने |
| 3. | मे. सुंदर कन्स्ट्रक्शन | 10.00% जास्त दराने |
| 4. | मे.जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | 15.50% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 08.00% जास्त दराची मे.अमन असोसिएटस् यांची निविदा प्राप्त आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांच्या मान्यतेअन्वये मे.अमन असोसिएटस् यांना दरपृथःकरणासह मा.आयुक्त यांचे दालनात दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलावण्यात आले असता, सदरील कामासाठी वापरण्यात आलेले अंदाजपत्रक हे सन 2005-2006 च्या जिल्हा दरसूचीनुसार आहे व सन 2006-07 च्या जिल्हा दरसुचीनुसार सद्यःस्थितीत सिमेंटचे दर व सर्वच बिल्डींग मटेरीयलचे दर वाढले असल्या कारणाने दरामध्ये सुमारे 23% जास्त अशी तफावत दिसून येते. तथापी दराबाबतच्या वाटाघाटी झाल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने दाखल केलेले दर म्हणजेच अं.प.दरापेक्षा 8.00% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 6.00 जास्त दराच्या निविदा प्रस्तावास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती सभेसमोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

वरील कामाची निविदा काढल्यानंतर जायमोक्यावर जागेचा ताबा मिळणेसाठी दिरंगाई होत असल्याने आजपर्यंत सदरील संरक्षित भिंतीचे काम प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये जागा बदलून तेच काम नारेगांव टेंचिंग ग्राऊंड/नारेगांव कब्रस्थान व स्मशानभुमी येथे केल्यास महानगरपालिकेच्या जागेचे संरक्षण करता येईल.

करीता बनेवाडी येथे आरक्षण क्र.2 व 3 मध्ये कब्रस्थान व स्मशानभुमी करीता संरक्षित भिंत बांधणे ऐवजी जागा बदलून नारेगांव टेंचिंग ग्राऊंड/नारेगांव कब्रस्थान व स्मशानभुमी येथे संरक्षित भिंत बांधणेच्या जागा बदलणे बाबतचा प्रस्तावास दि.19.3.2008 रोजीच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त आहे.

करीता सदरील कामासाठी मे.अमन असोसिएटस् यांची अं.प.दरापेक्षा 8% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 6% जास्त दराचे निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवडी येथील आरक्षण क्र.2 व 3 मध्ये कब्रस्थान व स्मशानभुमी करीता संरक्षित भिंत बांधणेचे काम, जागेचा ताबा मिळणेसाठी दिरंगाई होत असल्याने प्रलंबीत असल्यामुळे, बनेवाडी येथे आरक्षण क्र.2 व 3 मध्ये कब्रस्थान व स्मशानभुमी करीता संरक्षित भिंत बांधणे ऐवजी जागा बदलून नारेगांव टेंचिंग ग्राऊंड/नारेगांव कब्रस्थान व स्मशानभुमी येथे संरक्षित भिंत बांधणेचे काम मे.अमन असोसिएटस् यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 6.00% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 470 :**

(दि.15/3/2008 च्या सभेती स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. **451**)

आयुक्त प्रस्ताव सादर करत आहे की, औरंगाबाद हे एक महत्वाचे औद्योगीक व ऐतिहासीक शहर असल्यामुळे व वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढत आहे व त्यामुळे अपघात, इतर गंभीर आजारांचे प्रमाण दिवसेदिवस वाढत असल्यामुळे, भुकंप, साथीच्या आजारांचा उद्रेक यासारखी आपतकालीन परिस्थिती कित्येक वेळा उद्भवत असते, रुग्ण अत्यवस्थ झाल्यास सुरवातीच्या १ तास त्याला योग्य ते उपचार देण्यास महत्वाचा ठरतो, यासाठी Emergency Medical Service Center सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे यात १. या आपातकालीन वैद्यकीय सेवेमध्ये महानगरपालिका मुख्य समन्वयक म्हणुन काम करेल. महानगरपालिकामध्ये आपातकालीन वैद्यकीय सेवा कॉन्सीलची स्थापना करण्यात आलेली आहे. या सेवेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व इतर खाजगी रुग्णालय ज्यांच्याकडे इ.एम.एस. अँबुलंन्स आहे ते प्रथम भागीदार असतील, आत्तापर्यंत कमलनयन बजाज रुग्णाल,हेडगेवार रुग्णालय, धुत हॉस्पीटल, अॅपेक्स रुग्णालय, एम.जी.एम. रुग्णालय हे प्रथम भागीदार झालेले आहेत.

२. महानगरपालिका व इतर भागीदार रुग्णालयामध्ये करार करण्यात येईल (एम.ओ.यू.) व त्यामधील अटी व शर्तीचा भंग झाल्यास इ.एम.एस. कॉन्सील तर्फे त्या भागीदाराचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

३. इ.एम.एस. रुग्णवाहीकेसाठी व इतर रुग्णवाहीकेसाठी इ.एम.एस. कॉन्सील ठरवेल तेवढे शुल्क प्रति कॉल आकारण्यात येईल व ते त्या संबधीत भागीदार रुग्णालयात आकारले जाईल. शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय येथे रुग्णाने पसंती दिल्यास व तो दारिद्रय रेषेखाली असल्यास मनपातर्फे इ.एम.एस. कॉन्सील ठरवेल त्याप्रमाणे शुल्कात सुट देण्यात येईल.

४. या कॉल सेंटरचा एक विशिष्ट नंबर असेल.तो टोल फ्री असेल ज्या रुग्णालयांना इ.एम.एस. कॉन्सीलने मान्यता दिलेली आहे अशा रुग्णालयाशी हा नंबर वायरलेस यंत्रणेने संलग्नीत असेल. या विशिष्ट नंबरवर नागरीकांनी फोन केल्यास त्यांना ताबोडतोब ही सेवा दिली जाईल.

५. **ई.एम.एस. सिस्टीम मध्ये महानगरपालिकेची जबाबदारी** -अ) या कॉल सेंटरसाठी जी.पी.आर.एस. सेवा मनपातर्फे उपलब्ध करुन दिली जाईल. ब) टेलीकॉमचा खर्च मनपातर्फे केला जाईल (यात टोल फ्री नंबरची कॉस्ट, ग्रुप मोबाईलची कॉस्ट व बिल्स)

६. **ई.एम.एस. सिस्टीम मध्ये एजंन्सीची जबाबदारी -** जागा,फर्निचर, ईलेक्टक्टीक बील , २ टेलीफोन लाईन, सेंटल सर्व्हेर, २ रिंग कॉल पीकअप , इक्वीपमेंटची देखभाल व दुरुस्ती, १ मॅनेजर, राउंड द क्लॉक ज्यात ३ कर्मचाऱ्यांपैकी कमीत कमी १ डॉक्टर असेल ही जबाबदारी अेजंन्सीची असेल, या सिस्टीममध्ये काम करणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्या वेतनाची जबाबदारी अेजंन्सीची राहील, संगणक, लॅपटॉप पॉवर बॅकअप,जनरेटर, युपीएस, अे.सी. तसेच EMS कॉल सेंटरचे संगणकासाठी लागणारे सॉफटवेअर अेजन्सीचे असेल. हे कॉल सेंटर २४ तास कार्यरत असेल.

या बाबीचा ठराव दि.२६.१०.२००७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर झालेला आहे. त्याअनुषंगाने ई.एम.एस. कॉल सेंटर ची निवीदा Times of India (Mumbai), Maharashtra Times (Pune), Dainik Lokmat (Aurangabad) Navbharat (Mumbai) या वर्तमानपत्रात दि, १३.०२.२००८ रोजी जाहीरात प्रसिध्द करुन Expression of Interest मागविण्यात आले होते. मुदतीअंती ४ Proposals प्राप्त झाले ते खालील प्रमाणे.

| Sr. No | Particulars | r.Sunil B.Dhule (Rate Per Year) | Dr.Pradeep Benzerge (Rate Per Year) | Manisha Infocom Services Pvt.Ltd. (Rate Per Year) | Chatrapati Shivaji Diksha Prasarak Mandal (Rate Per Year) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | If System is install from concern party ( Inclusive all Facility) | Rs.14,40,000/- +Rs.५,००,०००/- (System Installation Charges) **= Rs.19,40,000/-** | Rs.19,00,000/- + Rs.6,00,000/- (System Installation Charges) **= Rs.25,00,000/-** | Rs.14,40,000/- (System installation in House) **= Rs.14,40,000/-** | Not Quoted |

वरील प्राप्त झालेल्या Proposals मध्ये Infocom Service Pvt.Ltd. हे सदरील सर्व्हिस हि त्यांच्या जागेत एम.आय.डी.सी. एरीया चीकलठाणा येथे Install करणार असून त्यांचे दर सर्वात कमी आहे व त्यांच्या या कामाचा अनुभव बघता त्यांच्या दरास मान्यता देऊन १ वर्षाचे कार्यादेश देण्यास्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :**

औरंगाबाद शहराचे औद्योगीक व ऐतिहासीक महत्वामुळे तसेच वाढत्या शहरीकरणामुळे वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता आपतकालीन परिस्थिती उद्‌भवल्यास रूग्णास सुरवातीच्या १ तास त्याला योग्य ते उपचार तातडीने मिळावेत यासाठी Emergency Medical Service Center सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या Proposals पैकी सर्वात कमी दर असलेले व कामाचा अनुभव लक्षात घेऊन Manisha Infocom Services Pvt.Ltd. यांचे प्रतिवर्ष रक्कम रू. **14,40,000/-** या दरास तसेच त्यांना एक वर्षाचे कार्यादेश देण्यास प्रस्तावातील अटी शर्तीस अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 471 :**

(दि.15/3/2008 च्या सभेती स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. **445**)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गारखेडा स.नं. 51 व 52 नाथ प्रांगण येथे कारगील वन उभारणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.16,73,574/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेने विशेष अटी व शर्तीसहीत दि.26.10.2007 रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 1 निविदा विक्री झाली व 1 निविदा दर भरून प्राप्त झाली.

1. गोसावी एस. के. 17.21% जास्त दराने

उपरोक्त नुसार गोसावी एस. के. यांची अं.प.दरापेक्षा 17.21% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली असल्या कारणाने संबंधीत गुत्तेदारास मा.आयुक्त यांच्या दालनात दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता अं.प.दरापेक्षा 17.21% जास्त दराऐवजी 12% जास्त दराने सदरील निविदा स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

सदरील कामा अंतर्गत खालील अटी व शर्तीचा समावेश करण्यात आलेला आहे.

1. सदरील उद्यानाचे नियोजित विकास कामे पुर्ण झाल्यानंतर पुढील 3 वर्षाच्या कालावधी करीता उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीसह संबंधीत नियुक्त मक्तेदारांनी/एजसीने करणे आवश्यक राहील. 3 वर्षानंतर सुस्थितीत विनाअट, विना मोबदला सदरील उद्यान महानगरपालिकेस हस्तांतरण करणे बंधनकारक राहील. सदरील ग्रीनबेल्ट अंतर्गत बसविण्यात येणारी खेळणी नामांकित रिगल/अरिहंत कंपनीची आयएसओ प्रमाणित असणे बंधनकारक राहील.
2. सदरील उद्यानाचे काम ज्या मक्तेदारास/एजन्सीला देण्यात येईल त्यांनी सिध्दार्थ उद्यानाच्या धर्तीवर व मंजुर दरानुसार प्रवेश शुल्क, पार्कींग शुल्क लावून त्यातून जमा होणाऱ्या महसुलातून उद्यानाचा देखभाल दुरूस्तीचा खर्च 3 वर्षापर्यंत करावे.
3. सदरील उद्याना करीता नियुक्त मक्तेदार/एजन्सीला काम प्रगतीपथावर असतांना प्रत्येक दरम्यानच्या देयकापैकी निव्वळ 77% देयक अदा करण्यात येईल. तसेच नियोजित काम पूर्ण झाल्यानंतर संबंधिताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून रोखुन ठेवलेल्या 23% रक्कमेपैकी 5% रक्कम संबंधित देयकाच्या 1 वर्षाच्या कालावधीनंतर, 6% रक्कम दोन वर्षाच्या कालावधीनंतर, 7% रक्कम तीन वर्षाच्या कालावधीनंतर व उर्वरीत 5% रक्कम सदरील उद्यान सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतरण केल्याच्या 90 दिवसानंतर अदा करण्यात येईल.
4. प्रत्येक वर्षी 26 जानेवारी, 15 ऑगष्ट, 1 मे, 8 डिसेंबर यासारख्या महत्वाच्या दिवशी महानगरपालिकेने काही कार्यक्रम उद्यानात आयोजित केल्यास संबंधीत मक्तेदारास/एजन्सीला त्या कार्य्रमासाठी उद्यानातील जागा, उद्यान विनामुल्य उपलब्ध करून द्यावे लागेल.

त्यानुसार गोसावी एस. के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.21% जास्त दराऐवजी 12% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

गारखेडा स.नं.51 व 52 नाथ प्रांगण येथे कारगील वन उभारणे करीता प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम गोसावी एस.के. यांच्याकडून 12% जास्त दराने करून घेण्यास, प्रस्तावात नमूद केलेल्या अटी शर्तीस अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 472 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.82 अंतर्गत परिजातनगर, रेल्वेस्टेशन रोड, राजमाता हौ.सो. येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याचे सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपाकीय रक्कम रू.14,77,614/- होत आहे. सदरील

काम सर्वसाधारण सभा विषय क्र.7/05 दि.20.11.2007 अन्वये वळती केलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे. त्यास सन 2008-09 च्या अर्थसंकल्पात यासाठी तरतुद उपलब्ध होणेस आणि अंदाजपत्रक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर करणेस मा.आयुक्त यांची मान्यता आहे.

तरी रक्कम रू.14,77,614/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :.**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.82 अंतर्गत परिजातनगर, रेल्वेस्टेशन रोड, राजमाता हौ.सो. येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,77,614/- च्या अंदाजपत्रकास तसेच या कामासाठी सन 2008-09 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 473 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.88 अंतर्गत विविध ठिकाणी (राजनगर, मयुरबन, शांतीनाथ हौ.सो., दिपनगर, रामचंद्रनगर, अजिंठा सोसायटी) रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.17,08,250/- असून सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण 3 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 18.99% जास्त दराने |
| 2. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 22.22% जास्त दराने |
| 3. | एम. ए. सिद्यीकी | 22.86% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी सर्वात कमी दर आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे असून त्यांच्या निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.99% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.20,32,647/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 18.99% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.88 अंतर्गत विविध ठिकाणी (राजनगर, मयुरबन, शांतीनाथ हौ.सो., दिपनगर, रामचंद्रनगर, अजिंठा सोसायटी) रस्त्याचे पुनःर्डांबरीकरणाचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 18.99% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 474 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.88 अंतर्गत म्हाडा कॉर्नर ते रेल्वेगेट जवळ तसेच देवानगरी टेहलसिंग विहार अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,94,179/- असून सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण 2 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | एम. ए. सिद्यीकी | 19.86% जास्त दराने |
| 2. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 23.21% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी सर्वात कमी दर एम. ए. सिद्यीकी यांचे असून त्यांच्या निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.86% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.16,71,063/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी एम. ए. सिद्यीकी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 19.86% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.88 अंतर्गत म्हाडा कॉर्नर ते रेल्वेगेट जवळ तसेच देवानगरी टेहलसिंग विहार अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरणाचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक एम. ए. सिद्यीकी यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 19.86% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 475 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, शांतीनाथ सोसायटी ते गादीया विहार 50 फुट डी.पी. रस्त्यावरील पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे व डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,75,400/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण 2 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 14.66% जास्त दराने |
| 2 | अरोरा कन्स्ट्रक्शन | 14.88% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर अं.प.दरापेक्षा 14.66% ने जास्त आहेत.त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.10,65,128/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 14.66% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीनाथ सोसायटी ते गादीया विहार 50 फुट डी.पी. रस्त्यावरील पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.66% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद